एफ.क्र.१/३४/२०१४-आयआर
भारत सरकार
आस्थापन, सार्वजनिक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालय
(आस्थापना व प्रशिक्षण विभाग)

नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
दिनांक १६ मार्च २०१६.

परिपत्रक

**विषय : स्वाधिकारे माहिती प्रकट करण्यावरील तज्ञ समितीच्या शिफारशीचे परीक्षण करण्यासाठी -श्री.देवेश चतुर्वेदी,सह सचिव - आस्थापना व प्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीचा अहवाल.**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ याच्या कलम ४ ची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी इतर गोष्टींबरोबरच त्यासाठीच्या उपाययोजनांची शिफारस करण्याकरिता, श्री.ए.एन.तिवारी, माजी मुख्य माहिती आयुक्त व डॉ.एम.एम.अन्सारी केंद्रीय माहिती आयोगाचे माहिती आयुक्त यांचा समावेश असलेली एक तज्ञांची समिती घटित केली होती. या समितीने तिचा अहवाल सादर केला असून तो शासनाने स्वीकारला आहे आणि समितीच्या शिफारशींचे अनुपालन करण्यासाठी सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना दि.२९ जून २०१५ रोजी कार्यालयीन ज्ञापन देण्यात आले होते. त्यानंतर आस्थापना व प्रशिक्षण विभागाने याबाबत सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना का.ज्ञा.क्र.१/१/२०१३ -आयआय, दि.९ जुलै, २०१५ अन्वये, अर्जदारांकडून वारंवार मागविण्यात आलेल्या माहितीचे विभागाने विश्लेषण केले पाहिजे आणि ती माहिती स्वाधिकारे माहिती प्रकट करण्यासाठी म्हणून, त्यांच्या संकेतस्थळावर दिली पाहिजे, अशा सूचना दिल्या आहेत.

२. आणखी, तज्ञ समितीच्या शिफारशींपैकी काही शिफारशींचे अधिक परीक्षण करण्यासाठी डॉ.देवेश चतुर्वेदी, सह सचिव, आस्थापना व प्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ याच्या कलम ४ अन्वये स्वाधिकारे माहिती प्रकट करण्यासंबंधात समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी निर्गमित करावयाचे प्रस्तावित कार्यालयीन ज्ञापन याबाबत जोडलेले आहे.

३. इच्छुक व्यक्तींनी, सोबत जोडलेल्या कार्यालयीन ज्ञापनावरील त्यांची मते/सूचना, ई-मेलव्दारे या विभागाला दि.३१.३.२०१६ पर्यन्त पाठविण्याची विनंती करण्यात येत आहे. ई-मेल : usirdopt@nic.in

स्वाक्षरी
(गायत्री मिश्रा)
संचालक (आयआर)
दूरध्वनी २३०९२७५५.

प्रती,
सर्व मंत्रालये/विभाग
प्रत रवाना,
एनआयसी, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
वेबसाईटवर अपलोड करण्याच्या विनंतीसह

Implemention of suo moto disclosure under RTI- Order given by CSIS- instruction to CS.